स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतीलखेळाडूंची अभिवृत्ती, सहभाग व कामगिरी,एक अभ्यास

शारीरिक शिक्षण विद्याशाखेच्या शारीरिक शिक्षण विषयातविद्यावाचस्पती (पिएच.डी.)पदवीसाठीस्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सादर करण्यात येणा–या शोध प्रबंधाचा आराखडा मान्यतेस्तव सादर

संशोधन आराखडा
(प्रारुप)

संशोधक

हेमंत त्रिंबकराव शिंदे

क्रीडा संचालक, तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव

मार्गदर्शक

प्रा.डॉ. व्यंकट माने

शारीरिक शिक्षण संचालक,
दिगंबरराव कला, वाणिज्य व विज्ञान,
महाविद्यालय, भोकर

2019

अनुक्रमणिका

1 **प्रकरण 1 ले**

1. प्रास्ताविक
2. समस्या कथन
3. अध्ययनाचा उदिष्टे
4. समस्येचे महत्व
5. परिकल्पना
6. व्याप्ती
7. मर्यादा
8. व्याख्या

2 **प्रकरण 2 रे**
संशोधन साहित्याचा आढावा

3 **प्रकरण 3 रे**
संधोधन पध्दती

1. संशोधन स्थान
2. प्रतिसादक (सबजेक्टस)
3. चल
4. अभिवृत्ती मापीका
5. सहभागः
6. कामगिरीः
7. संशोधन पध्दती
8. सांख्यकीय तंत्र

4 **प्रकरण 4 था**
माहितीचे पृथःकरण व सांख्यिकीय विश्लेषण

5 **प्रकरण 5 वे**
सारांश, निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सुची

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूंची अभिवृत्ती, सहभाग व कामगिरी,एक अभ्यास

प्रकरण 1 ले

प्रस्ताविक

शारीरिक शिक्षणः

मुलामुलींच्या शारीरिक, बौध्दिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी आनंददायी, गतिमान व क्षमतावर्धक अशा शारीरिक हालचालींद्वारे नियोजनपूर्वक दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण होय.

शारीरिक शिक्षणाची उद्दिष्टे

1. **कार्यक्षमतेचा विकास** ः इंद्रियविकास आणि शरीराची सुदृढता यांवर शारीरिक कार्यक्षमता अवलंबून असते.
2. **मज्जासंस्था व स्नायुसंस्था यांतील सहकार्यात्मक विकासः** शारीरिक क्रियांचे कौशल्य वाढवणे, हे शारीरिक शिक्षणाचे दुसरे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

3. **व्यक्तिमत्वाचा विकासः** व्यक्तिचा शारीरिक, बौध्दिक, भावनिक, सामाजिक विकास साधून तिच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणे.

4. **मनोरंजनः** व्यक्तीला आनंद, समाधान व स्वास्थ्य प्राप्त करून देणारी प्रक्रिया म्हणजे मनोरंजन होय. म्हणूनच मनोरंजन हा शारीरिक शिक्षणाचा अविभाज्य भाग आहे.

2. मैदानीस्पर्धा

धावण्यच्या शर्यती, चालण्याच्या शर्यती, उडयांचे प्रकार, फेकींचे प्रकार, अडथळयांच्या शर्यती इ. शास्त्रोक्त पध्दतीने खेळल्या जाणा–या स्पर्धात्मक क्रीडाप्रकारांचा समावेश व्यायाम व मैदानी खेळामध्ये होतो. व्यायाम व मैदानी खेळ हे जगातील प्राचीन व लोकप्रिय क्रीडाप्रकार आहेत. ट्रॅक ॲण्ड फील्ड व युरोपीयन देशामध्ये ॲथलेटिक्स या संज्ञा सामान्यतः रूढ आहेत.

मैदानी खेळामध्ये तीन प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होतो. या स्पर्धांचे संक्षिप्त वर्णन खालीलप्रमाणे,

अ. धावण्याच्या शर्यती

1. वेगवान शर्यती(Sprint Races): 100 मीटर, 200 मीटर, 400 मीटर

2. मध्यम अंतराच्या शर्यती(Middle distance races): ८०० मीटर, १५०० मीटर

3. लांब अंतराच्या शर्यती(Long distance races): ३००० मीटर, ५००० मीटर १०,००० मीटर, मॅरॉथॉन

4. अडथळयाच्या शर्यती(Hurdle races): ११० मीटर, ४०० मीटर

5. रिले शर्यती(Relay races): ४ बाय १०० मीटर, ४ बाय ४०० मीटर

6. मॅराथॉन शर्यत(Marathan): ४२.१५ किलोमीटर

7. शिखरलक्ष्यी शर्यत(Steeple Chase): ३००० मीटर

8. क्षेत्रपार शर्यत(Cross country race): ४ ते १२ किलोमीटर

9. चालण्याची शर्यत(Walking race): १०, २०, ५० कि.मी.

ब. फेकींच्या स्पर्धा:

1. गोळा फेक
2. थाली फेक
3. भाला फेक
4. हातोडा फेक

क. उडयांच्या स्पर्धा

1. उंच उडी
2. लांब उडी
3. लंगडझाप
4. बांबू उडी

प्राचीन ग्रीसमध्ये ऑलिंपिक क्रीडा सामन्यांना इ.स.पू. सुमारे 776 मध्ये सुरुवात झाली. या स्पर्धा दर चार वर्षांनी भरवल्या जात. इ.स. 393 मध्ये त्या बंद पडल्या. ग्रीक स्त्रियांच्याही वेगळ्या क्रीडास्पर्धा दर चार वर्षांनी भरवल्या जात. इंग्लंडमध्ये इ.स. सुमारे 1154 मध्ये मैदानी क्रीडास्पर्धांना प्रारंभ झाला. पण त्यांना खरी लोकप्रियता लाभली, ती एकोणिसाव्या शतकात. रस्त्यावर घोडागाडीपुढे पादचा–यांनी पायी धावण्याच्या शर्यती (पिडोस्ट्रिॲनिझम) अठराव्या शतकात लोकप्रिय होत्या.

अर्वाचीन ऑलिंपिक क्रीडासामने ग्रीस देशातील अथेन्स येथे 1896 मध्ये प्रथम भरवले गले, त्यात धावमार्ग स्पर्धांमध्ये दहा देशांच्या स्पर्धकांनी भाग घेतला होता. आंतरराष्ट्रीय मैदानी क्रीडासामन्यांचे नियमन व नियंत्रण करणारी इंटरनॅशनल अमॅच्युअर ॲथलेटिक फेडरेशन (आय. ए. ए. एफ.) ही संघटना

1912 मध्ये सोळा देशांनी मिळून स्थापन कली. सध्या 180 देश तिचे सदस्य आहेत. ही संघटना स्त्री व पुरुष खेळाडूंच्या एकूण 65 ॲथलेटिक क्रीडाप्रकारातील विश्वविक्रमांची नोंद ठेवते. हे विश्वविक्रम सामान्यत मेट्रिक परिमाणातील अंतर विचार घेउन नोंदवले जातात.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाची स्थापना हैद्राबाद मुक्ती संग्राम दिनी म्हणजेच 17 सप्टेंबर 1994 रोजी झाली व आतापर्यंतच्या कालावधीत विद्यापीठात दरवर्षी आंतर महाविद्यालयीन विविध क्रीडा स्पर्धेचे आयोजन संलग्नीत महाविद्यालयाच्या सहकार्याने केले जाते. सुरुवातीस जवळपास सर्वच स्पर्धांचे आयोजन हे केन्द्रीय पध्दतीने होत असे. परंतू आलीकडे महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 नुसार विभागावर (अ ब ग ड गट) व नंतर आंतर विभागीय क्रीडा स्पर्धोचे आयोजन करण्यात येवू लागले. सदर स्पर्धेनंतर विविध क्रीडा प्रकारच्या निवड चाचणी घेवून निवड चाचणीद्वारे निवडलेल्या व स्पर्धो घेवून निवडलेल्या खेळाडूं करिता मार्गदर्शन शिबीर आयोजीत करण्याची पध्दत अवलंबिली जाते. या शिबारातुन स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापीठचा संघ निवडून आंतर विद्यापीठीय स्पर्धेत सहभाग घेण्याकरता पाठविला जातो.

आज पर्यंत अनेक वेळा, अनेक ठिकाणी विविध खेळाच्या सहभाग करिता संघ तयार करण्यात समाधानकारक कामगिरी विद्यापीठाच्या खेळाडूंनी बजाविली आहे. आजपर्यंत संपन्न झालेल्या अश्वमेघ क्रीडास्पर्धांमध्ये यशस्वी कामगीरी केली आहे.

क्रीडा स्पर्धाच्या आयोजनाला क्रीडा क्षेत्रात अनन्य साधारण महत्व आहे. कारण Competition for Competence Development हे जीवन विषयक तत्व यामध्यमाद्वारे विद्यार्थ्यांच्या अंगी बिंबविले जाते. खेळाडूचे वर्षभर किंवा वर्षानुवर्षे केलेल्या मेहनतीची, सरावाची परिणीती कौशल्यांच्या कार्यत्मणाच्या रूपाने कशी होते हे पाहण्याचे किंवा पडताळण्याची स्पर्धा हे एकमेव ठिकाण असते. शिवाय या ठिकाणी खेळाडूला मिळते, क्रीडा स्पर्धोच्या दरम्यान खेळाडूला अनेक गोष्टी शिकायला मिळत असतात. या विद्यापीठात क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लागणारे योग्य नियोजन, व्यवस्थापन, संघटन, प्रशासन प्रशिक्षण पर्यवेक्षण, या सर्व शास्त्रोक्त बार्बीचे ज्ञान खेळाडूंना आणि क्रीडा क्षेत्रात काम करणा–या व्यक्तिला या निमित्ताने दिले जाते. आणि त्यातुन सर्व स्पर्धेचे आयोजन व्यवस्थित पार पाडले जाते.

समस्येचे कथनः

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूंची अभिवृत्ती, सहभाग व कामगिरी,एक अभ्यास. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूंची अभिवृत्ती, सहभाग व कामगिरी आजही भरतात विशेषतः ग्रामीण भागात भरपूर क्रीडा गुणवत्ता असून त्याला पुरेसा वाव मिळालेला नाही. क्रीकेट खेळ सोडून दुस–या क्रीडा प्रकाराचा प्रसार व प्रसार पोहोचला नाही, याला क्रीकेटला दोष न देता दुस–या खेळाच्या विविध पैलू वर विचार करणे गरजेचे आहे. ॲथलेटिक्स म्हणजे शर्यती, उडया व फेकी. महाराष्ट्रीयन व भारतीय खेळाडूंनी अद्याप किती तयारी व पल्ले गाठायचे आहे हे संशोधनावरून समाजण्यास मदत होईल. क्रीडा तज्ञ, क्रीडा शिक्षक, क्रीडापटू, क्रीडा मार्गदर्शक, ॲथलेटिक्स स्पर्धा भरविणारे संस्थाचालक, शहरी व ग्रामीण भागातील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा अद्यापक विद्यालय, अध्यापक महाविद्यालये, विद्यापीठे, खाजगी कलब व शारीरिक शिक्षक संस्था या सर्वांना संशोधन निष्कर्षामुळे ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारला गती देण्यास मदत होईल.

3. अध्ययनाचे उद्‌देश

1. आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्ध्रेतील पुरूष खेळाडूच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे

2. आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्ध्रेतील महिला खेळाडूच्याअभिवृत्तीचा अभ्यास करणे

3. आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील पुरूष खेळाडूंचा सहभागाचे मूल्यमापन करणे.

4. आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील महिला खेळाडूंचा सहभागाचे मूल्यमापन करणे.

5. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतील पुरूष खेळाडूंची कामगिरीचा निरिक्षण करणे.

6. आंतर महाविद्यालयीन स्पर्धेतील महिला खेळाडूंची कामगिरीचा निरिक्षण करणे.

7. आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील पुरूष व महिला खेळाडूंना खेळात येणा–या अडीअडणींचा अभ्यास करणे.

5. **संशोधनाची आवश्यकता व महत्वः**

या संशोधनाची गरज, आवश्यकता व महत्व नमुद करताना खेळाडूच्या सहभागातून त्यांच्या अभिवृत्ती व कामगिरी कशी आहे याबाबत विविध अंगाने अभ्यास करणे आवश्यक आहे.

महाविद्यालयीन स्तरावर होणारे विविध उपक्रम, सराव वर्ग, प्रशिक्षण वर्ग, शिबीरे यांच्या विद्यार्थ्यांच्या सहभागावर महत्वाचा वाटा असतो. त्याचे उपयोजन चांगल्या प्रकारे केल्यास सहभाग व कामगिरीला गती लाभते. सहभाग व कामगिरीत अडचणी कोणत्या आहे व त्यावर उपाय कशा प्रकारचे शोधायचे त्याचाहि विचार येथे करावयाचा आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडा सहभागातून अभिवृत्ती व कामगिरी विकसित होते आणि हे महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतून भक्कम होते. विद्यार्थ्यांच्या क्षमता विकास सर्वांगिण व्हावा, त्याच्यातील आंतरिक आणि बाहय गुण प्रभाविपणे प्रकट व्हावेत म्हणून क्रीडा सहभागाला महत्व आहे.

संशोधनाची परिकल्पना

1. मैदानी खेळात पुरूष खेळाडूची अभिवृत्ती कमी नाही.
2. मैदानी खेळात महिला खेळाडूची अभिवृत्ती कमी नाही.
3. पुरूष खेळाडूचा मैदानी खेळात सहभाग समाधानकारक आहे.
4. महिला खेळाडूचा मैदानी खेळात सहभाग समाधानकारक नाही.
5. आंतर महाविद्यालयीन पुरूष मैदानी खेळाडूंची कामगिरी समाधानकारक नाही.

6. आंतर महाविद्यालयीन महिला मैदानी खेळाडूंची कामगिरी समाधानकारक नाही.

7. पुरूष व महिला आंतर महाविद्यालयीन मैदानी खेळाडूंना खेळात विविध आव्हानांना तोंड घ्यावा लागतो.

संशोधनाची व्याप्ती

1. आंतर महाविद्यालयीन पुरूष मैदानी खेळाडूंची अभिवृत्ती समजण्यास मदत होईल.
2. आंतर महाविद्यालयीन महिला मैदानी खेळाडूंची अभिवृत्ती समजण्यास मदत होईल.
3. पुरूष मैदानी खेळाडूंची मैदानी खेळाडूंचे सहभाग कळेल.
4. महिला मैदानी खेळाडूंची मैदानी खेळाडूंचे सहभाग कळेल.
5. पुरूष मैदानी खेळाडूंची मैदानी खेळात कामगिरीवर प्रकाश पडेल.
6. महिला मैदानी खेळाडूंची मैदानी खेळात कामगिरीवर प्रकाश पडेल.
7. आंतर महाविद्यालयीन पुरूष व महिला मैदानी खेळाडूंच्या खेळात येणा–या अडीअडचणी समजण्यास मदत होईल.

संशोधनाची मर्यादा

1. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत येणा–या आंतर महाविद्यालयीन पुरूष व महिला खेळाडूंची निवड करण्यात येईल.
2. फक्त 100 मी., 200 मी., 10,000 मी. धावणे लांब व उंच उडी गोळा, थाळी फेक या मैदानी खेळांची निवड करण्यात येईल.
3. मागील 2 वर्षातील आंतर महाविद्यालयीन मैदानी खेळात सहभागी पुरूष व महिला खेळाडूंची निवड करण्यात येईल.

महत्वाच्या व्याख्याः

1. अभिवृत्ती

अभिवृत्ती म्हणजे आवड, बाहय जगातील वस्तूविषयी किंवा वेगवेगळया गोर्ष्टीविषयी मनात आवड निर्माण होणे म्हणजे अभिवृत्ती होय.

2. क्रीडा सहभागः

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूचा विविध

मैदानी खेळांच्या स्पर्धामध्ये सहभाग क्रीडा सहभाग म्हणून संबोधित करण्यात आले आहे.

३. क्रीडा कामगिरीः

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूचा विविध मैदानी खेळांच्या स्पर्धामध्ये सहभागानंतर चढती किंवा उतरत्या क्रमांची कार्यकिर्दचे वेळेत पारितोषिक व विशेष प्राविण्य व स्पर्धा मध्ये क्रमांक म्हणजे क्रीडा कामगिरी होय. शरीर व मन यांच्यात एकत्रिकरणातून जी उर्जा निर्माण होते त्यावरुन कामगिरीचा विकास होतो.

प्रकरण 2 रे

संबंधीत साहित्याचे समालोचन

सदर अभ्यासाच्या संदर्भाने उपयुक्त असे साहित्य विविध ग्रंथालयातून हाताळणे गरजेचे असते याची जाणीव शोधकर्त्यास असल्यामुळे सदर साहित्य जेथे–जेथे उपलब्ध होईल त्या ठिकाणापासून उपलब्ध केले जाईल. त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या ग्रंथालयाला प्रामुख्याने भेट देवून तेथील उपलब्ध साहित्याचा अभ्यास करुन मनन, चिंतन

केल्या जाईल. अभ्यासाच्या दृष्टीने सखोल चर्चा करण्यात येईल. अशाच प्रकारे साहित्य नांदेड, नाशिक व मराठवाडा विभागातील अद्यावत व नामांकित ग्रंथालयातील साहित्यसदर संशोधनाकरिता महत प्रयत्नाने उपलब्ध करण्यात येईल. ज्यामुळे सदर संशोधनाची एक निश्चित दिशा ठरविण्यात मदत होईल.

सांगलीकर व कुलकर्णी (1997)

मैदानीक्रीडाप्रकार मूलभूत मानवी शरीरक्रिया व हालचाली यांतून अगदी सहजपणे प्राचीन काळात उगम पावले असावेत. शिकार करणे वा हिंस्त्र प्राण्यापासून स्वतःचा बचाव करणे, या हेतूने वेगाने धावणे, उडया मारुन वाटेतले अडथळे पार करणे, पाण्यातून पोहून पलीकडे जाणे, अनुकुचीदार दगड वा भाले तयार करून ते अचूक नेम धरून लक्ष्यावर फेकणे. अशा प्रकारच्या क्रिया व हालचाली करणे आदिमानवाला क्रमप्राप्तच होते. या हालचालींनाच कालांतराने निखळ क्रीडात्मक स्वरूप प्राप्त होवून त्यातून निरनिराळे व्यायाम व मैदानी क्रीडाप्रकार विकसित होत गेले असावेत, असे दिसते पुढे मुनष्य स्वभावातील स्पर्धावृत्तीच्या प्रभावाने शर्यतींचा उगम झाला असावा.

भागवत व तावडे (1984)

इंग्लंडमध्ये 1825 च्या सुमारे हौशी खेळाडूंच्या स्पर्धा भरवल्या जात. त्यातून आधुनिक मैदानी क्रीडास्पर्धांचा उदय झाला. पहिली आंतरविद्यापीठीय क्रीडास्पर्धा 1864 मध्ये ऑक्सफर्ड व केंब्रिज या विद्यापीठात, तर पहिली आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा 1895 मध्य न्यूयॉक्र ॲथलेटिक क्लब व लंडन ॲथलेटिक क्लब यांच्यात झाली.

प्रकरण 3 रे

संधोधन पध्दती

1. संशोधन स्थान

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत हे संशोधनाचे प्रमुख केंद्र आसेल व त्या अंतर्गत येणा–या महाविद्यालयीन पुरूष व महिला खेळाडूंची अभिवृत्ती, सहभाग व कामगिरी तपासण्या हेतू निवड करण्यात येईल.

2. प्रतिसादक (सबजेक्टस)

मागील 2 वर्षो मध्ये 150 आंतर महाविद्यालयीन पुरूष व 150 आंतर महाविद्यालयीन महिला मैदानी खेळामध्ये सहभाग घेतलेल्या खेळाडूंची निवड करण्यात येईल. प्रत्येक मैदानी

क्रीडा प्रकारामधून सर्वसाधारण 25 खेळाडूची निवड करण्यात येईल.

मैदानी खेळाची निवड

1. 100 मी. धावणे
2. 200 मी. धावणे
3. 10000 मी. धावणे
4. उंच उडी
5. लांब उडी
6. गोळा फेक
7. थाळी फेक

3. **चल**

1. अभिवृत्ती
2. सहभाग
3. कामगिरी

4. **अभिवृत्ती मापीका**

आवडकिंवा अभिवृत्ती या संज्ञेची नेमक्या शब्दात व्याख्याकरणे आवघड आहे. ज्या गोष्टींकडे आपल्या मनाचा ओढा असतो, ज्याच्याबद्दल आपल्या मनात आस्था असते किंवा जी आपल्याला मनापासून करावीशी वाटते ते आपल्याला आवडते, तिच्याबद्दल आहे असे म्हणता येईल. आपल्याला ज्या गोष्टी आवडत नाहीत किंवा ज्यांच्याबद्दल आपली अभिवृत्ती नसते त्या आपण टाळण्याचा प्रयत्न करतो. अर्थात ज्या विषयाबद्दल

अभिवृत्ती असते तो विषय आपले अवधान आकर्षून घेतो. इतकेच नव्हे तर विषयावर आपले अवधान टिकून राहते. जेथे अभिवृत्ती तो अवधान असतेच, म्हणून अभिवृत्ती वृध्दींगत होत जाते. अभिवृत्ती ही प्रेरणा आणि अवधान या दोहोंच्या मध्यवत्री असते. अभिवृत्तीसाठी इंटरेस्ट हा शब्द वरील दृष्टीने अन्वयर्थक आहे. इंटरेस्ट शब्दाचा व्यूत्पत्यर्थ म्हणजे मध्यवर्ती असणारी असा होतो.

अभिवृत्तीचे मापन दिशा, मात्रा किंवा अंश, तीर्थ स्वरूप, अविष्कार क्षमता किंवा अभिव्यक्ती, सुसूत्रता किंवा सुसंगती, प्रत्यक्ष पध्दती व अप्रत्यक्ष पध्दती या गुणधर्माच्या आधारे केले जाते. त्यांस आयाम असे म्हटले जाते. मैदानी स्पर्धेतील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत महाविद्यालयीन स्पर्धेतील खेळाडूंची अभिवृत्ती मापीकासाठी आधारित संशोधकांनी लाइक्टर्स (1932) व इडवर्ड (1957) यांनी अभिवृत्ती मापीकेसाठी च्या निकष, प्रमाण, नियंत्रण व सांख्यकीय तंत्राचा वापर करून मोजपट्‌टी तयार करण्यीच जी शास्त्रीय पध्दती दर्शविली त्याचा उपयोग सदरील संशोधनासाठी करण्यात येईल.

5. **सहभागः**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अतंर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतील खेळाडूंचा पूर्वी व नंतर म्हणजे प्राथमिकते पासून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यंतचा सहभाग नोंदविण्यात व मोजण्यात येईल.

6. **कामगिरीः**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अतंर्गत आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेतीलखेळाूची कामगिरी म्हणजे प्रत्येक सहभागानंतर खेळाडूची कारर्कीद म्हणजे क्रीडा सहभागानंतर क्रमांक स्पर्धो पूर्ण करण्यात वेळे मध्ये फरक किंवा उल्लेखनीय मामगिरीचा मूल्यमापन करण्यात येईल.

7. **संशोधन पध्दतीः**सर्वेक्षण संशोधन पध्दती

8. **सांख्यकीय तंत्र**

1. वारंवारिता
2. टक्केवारी
3. मध्यमान
4. गुण संख्या संबंध

प्रकरण 4 था

माहितीचे पृथःकरण व सांख्यिकीय विश्लेषण

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकांनी प्राप्त माहिती व माहितीचे संकलन वर्गीकरण व अर्थ निर्वचन करण्यात येईल. ज्यामुळे संशोधनाच्या उद्‌दिष्टाकडे जाणे सोपे होईल. प्राप्त माहितीच्या आधारे उद्‌दिष्टाच्या अर्थनिर्वचन व निष्कर्ष स्पष्ट करण्यात येईल. संशोधनाच्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी उपयुक्त, सांख्यिक तंत्राचा आधार घेतल्या जाईल.

प्रकरण 5 वे

सारांश, निष्कर्ष व शिफारशी

सारांश, निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणात संशोधनकर्त्याने व शोध प्रबंध पुर्णत्वास नेण्यासाठी प्रकरण 1 ते 4 मध्ये केलेल्या वा मांडलेल्या कार्य बाबीचा आढावा संक्षिप्त स्वरूपात उद्‌घोषि

त करण्यात येईल. त्याच बरोबर प्रकरण 4 मधून सहजरित्या पुढे आलेले निष्कर्ष व त्या अनुषंगाने प्रकरण 1 मध्ये केली गेलेली परिकल्पना पडताळून पाहण्यात येईल. त्याचा उल्लेख या प्रकरणांतून केला जाईल. शिवाय या शोध प्रबंधाला अनुसरुन

संशोधन कार्य करीत असतांना आढळून आलेल्या गोष्टी, सुचना व शिफारशीच्या माध्यमातून मांडण्यात येतील.

संदर्भ सूचीः

1. सांगलीकर व्ही. एन. पी. डी. कुलकर्णी 1997, *मैदानी खेळ अथलेटिक्स* अंबा प्रकाशन, कोल्हापूर.
2. अैनापुरे राजा, *आपले शारीरिक शिक्षण मर्दानी व मैदानी स्पर्धा* 2007 मे. आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे.
3. आगलावे प्रदिप (2000), *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन*, नागपूर.
4. बच्चेवार दिपक, मोरे साहेबराव, घायाळ बाबुराव (2013), *शारीरिक शिक्षणाचा इतिहास आणि पाया*, संकेत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती.
5. भागवत राम, तावडे रमेश (1984), *मैदानी स्पर्धा नियम व आयोजन*, ट्रॅक अँड फिल्ड पब्लिकेशन, पुणे.
6. चक्रदेव अनिल (1984), *ऑलिम्पिक*, प्रथमावृत्ती, आरती प्रकाशन, डोंबीवली (प.).
7. धरम विनोद (2003), *आंतरराष्ट्रीय विविध खेळ, नियम व शास्त्रोक्त माहिती*, मनोरमा प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती.

८.   जर्दे श्रीपाल (1996), *शारीरिक शिक्षणाचा इतिहास,* अंबा प्रकाशन, कोल्हापूर.

9.   जर्दे श्रीपाल (2000), *शारीरिक शिक्षण संशोधन तंत्र पध्दती,* अंबा प्रकाशन, कोल्हापूर.

10. लोवे डि. जी. (2008), *ॲथलेटिक्स प्राचिन, मध्ययुगीन आणि आधुनिक,* प्रथमावृत्ती रेड प्रकाशन, नवी दिल्ली.

11. जान्सन्न बोर्जेस, (2008), *डायमंड क्रीडा ज्ञानकोश* प्रथम आवृत्ती, डायमंड प्रकाशन, पुणे.

संशोधक

मार्गदर्शक

हेमंत त्रिंबकराव शिंदे
क्रीडा संचालक,
तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव

प्रा. डॉ. व्यंकट माने
शारीरिक शिक्षण संचालक,
दिगंबरराव कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय,
भोकर.